# शारी मिरी मळ्या

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय काव्य
दा. क्र. ८७२९



IRBK 0108129
IRBK-0108129

कवयत्री :- सौ. शांताबाई रोडे

दा. क्र. १२९

# मन्या नी शरी

एके दिवशीं
झाली कैशीं
गंमत खाशी
मन्या नी शरी गेली चौपाटीशी । चौपाटीशी ॥

त्यांनीं केला वाळूचा डोंगर
निशाण लावलें त्याच्यावर
पळत सुटले भराभर
वाळू सरली सरसर
मन्याची स्वारी आपटली
धपकन खालीं पडली
अंगाला वाळू चिकटली
शरी लागली हंसायला
मन्यानी भोकाड पसरला
आँ ऽऽऽ आँ ऽऽऽ आँ ऽऽऽ

अनुक्रम ... विभाग ... क्रमांक २८०५९ नों. दि. १३/९/९०
२८०५९
म. ग्रं. सं. ठाणे, ग्रं.
दा. क्र. १२९
IRBK-0108129
IRBK-0108129

# मीरी

मीरी आमची फाकडी
वेणी घालते वाकडी ॥

रिबीन लावते तोकडी
कुंकवाची टिकली ॥

पाटी घेते फुटकी
पेन्सिल घेते तुटकी ॥

पट्टी घेते. मोडकी
अंकलिपी ही फाटकी ॥

अभ्यास कांहीं करत नाहीं
खाऊ सारखा मागत राही ॥

# मीरी आणि मेधा

दप्तर खांद्यावरी
चालली शाळेला ही मिरी ॥ ध्रु० ॥
छान चिमुकली मुलें खेळती
नाचुनि गाती खरी ॥ चालली........॥ १ ॥
गोट्या खेळूनी उंच मनोरे
लाविती पटकन् जरी ॥ चालली........॥ २ ॥
उभे राहूनी ड्रील खेळती
वंड्या माधव शरी ॥ चालली......॥ ३ ॥
शोभा मेधा रमेश शरदही
चंद्या खोड्या करी ॥ चालली......॥ ४ ॥

# लताचा पोपट

पोपट होता लताचा
पिंजऱ्यामध्यें बसायचा
लताला फार आवडायचा
मिठ्ठू मिठ्ठू बोलायचा ॥ १ ॥
रंग त्याचा हिरवागार
लाललाल चोंच बांकदार
माऊनीं ठेवला त्याच्यावर डोळा
हळूच पळवलं पोपटाला
लताऽ लागली रडायलाऽ ॥ २ ॥

# सुंदर साळू

दळू बाई दळू—
वाजरी दळू
दळायला बसली—
सुंदर साळू
बाजरीची रास
एवढासा बांस
पिठ कस पडताय
भूरुभूरु ॥ १ ॥

आम्हीं आपले बसलो
दळायला
येऊं नका आम्हांला
बघायला
अग बाई ग
आजी आली ग
चला आतां आपण
पटकन् पळूं ॥ २ ॥

# वाहुलीचें गाणें

चालः– गोरी गोरी पान...

छोटी छोटी छान । हळू गाई गान
आई मला एक बाहुली आण । आई मला एक बाहुली आण॥ १॥

बाहुलीला नेसायला रेशमाची साडी
रेशमाच्या साडीला जरीची काडी
रेशमाची काडी करी चमचम छान
आई मला एक बाहुली आण ॥ २ ॥

बाहुलीला बसायला लाल लाल गाडी
लाललाल गाडीला पोपटाची जोडी
पोपटाची जोडी गाई "मिठू मिठू" छान
आई मला एक बाहुली आण ॥ ३ ॥

बाहुलीशी गट्टी करतां तुला नाहीं पापा
तुला नाहीं पापा आतां तिच्याशी गप्पा
तिच्याशी गप्पा करतां वेळ जाईल छान
आई मला एक बाहुली आण ॥ ४ ॥

# चौपाटी

चला मुलांनो चला चला.......
चौपाटीवर जाऊं चला.......

रचुया डोंगर वाळूंचे
घरटें बनवूं चिमणीचें ॥

वेचूं शिंपा शंख किती
पतंग उडवूं उंच अति ॥

लाटा उसळती जोरांत
होडी चाले डौलांत ॥

थय थय नाचे सागर
नाचे चांदोबा ढगांवर ॥

पसरली वाळू चौफेर
आपण नाचूं तिच्यावर ॥

# आजोबा

सोडला खांद्यावरी सोगा
कसा दिसतो आजोबा सांगा। सोडलाऽऽऽऽ
पगडी घालीन डोईवर
जाड चाळशी डोळ्यांवर
येईल—येईल काठीनें शोभा ॥ १ ॥ कसा दिसतो....
झोळी घेई खांद्यावर
जोडा वाजें चटकदार
जाईन—जाईन बाजारा पटकन
पडले आजोबा धपकन ॥ २ ॥

# ससोबाची फजिती

ससोबा ससोबा लांब तुमचे कान
कापसाचा रंग उड्या मारतो छान
आकाशांत ढग गडगडले
तुमच्या छातीत धडधडले
धांपा टाकीत पळतां किती
ससोबाची फजिती ॥ १ ॥

# दिवाळी

( चाल:—आगडबंब... )

नाचत छुम्, छुम्, छुम्, छुम्,
आली दिवाळी आली दिवाळी ॥ ध्रु० ॥

आल्या या दीपज्योती जगा उजळीत
आकाशांत चांद्ण्यांनीं धरीलासे फेर ।
मध्यें नाचे चंद्रमा हा करितसे खेळ ।
चंद्र हासे । रजनी नाचे । चंद्र मंडळी ।
हो चंद्र मंडळी ॥ १ ॥

माणिकांचे दीप घेऊन जाऊं अंगणीं
चंद्रराया ओवाळूं या जमून मैत्रिणी ।
विद्या देई । प्रेम देई । ज्ञान उजळी ।
हो ज्ञान उळजी ॥ २ ॥

आनंदानें डोलताती लता नि वेली
घिरट्या घेऊन नाचूं लागे उडे पाकोळी ।
लता नाचे
वेली हासे
उडे पाकोळीऽऽ
हो उडे पाकोळी ॥ ३ ॥

# कैरीवाला

कैरीवाला कैरीवाला आला कैरीवाला कैरीवाला
चैत्र गौरी पन्ह डाळ
खाऊनी सारे मस्त व्हाल
नटूनीया सजूनीया
मांडा या गौरीला ॥ १ ॥ कैरीवाला

चटणी वाटे चंपाताई
लोणच्याची झाली घाई
साखर आणा मोरांब्याला
ठेवाया बरणीला ॥ २ ॥ कैरीवाला

लताची ही लगीन घाई
चौघडा बॅन्ड वाजे सनई
ठुमकत मुरडत विहीणबाई
देती या पन्ह्याला ॥ ३ ॥ कैरीवाला

# गणेश वंदन

गणेश आले ग घरोघरी
चला ग दर्शना जाऊं सारी ॥ धृ ॥

आ ऽ ऽ ला आ ऽ ऽ ला
मधुर गंध
फुलें सुगंध
चांफा जास्वंद
लताना वेलीना
भर आला
परडी भरून जाऊं चला ॥ १ ॥

गुंऽऽफा गुंऽऽफा
सुंदर माळ
नाहीं हो वेळ
चला सकळ
आनंदे नाचूंया
गाऊं चला
वंदन करूं या गणेशाला ॥ २ ॥

वा. क्र. ६९२२ नों. दि. ...
वि. काव्य, ...

# चन्द्राची आश्विनी

आज आहे चन्द्राची आश्विनी
आला चान्दोबा नटूनी
पैरण चन्देरी घालूनीं
आल्या चान्दण्या सजूनी
हिरे माणिक घालूनी
पसरे प्रकाश चन्देरी
नाचे दर्या आनंदानें
हातीं घेऊनी रत्नदीप
नारी ओवाळती अनेक
व्या सम्पूर्ण चान्दोबा बघुनी ॥ आज—

संग्रहालय,
अनुक्रम २६९७८
विभाग वा. वा.
क्रमांक २०५९
नों. दि. २३।०१।७०

# मन्याचें गाऱ्हाणें

दादा गेला कीं, फिरायाला कीं,
फिरायाला कीं, फिरायाला ।

ताई गेली गेली कीं, खेळायाला कीं, ।
खेळायाला कीं, खेळायाला ।

आई बसली कीं दळायाला कीं दळायाला ।
कीं, दळायाला ।

येग येग कीं चिऊताई कीं चिऊताई ।
कीं, चिऊताई ।

दाणा खाई नी पाणी पिई कीं पाणी पीई
कीं, पाणी पीई ।

आला आला कीं पाऊस आला कीं पाऊस आला
कीं पाऊस आला कीं पाऊस आला

पाऊस आला सरकन्
चिमणी उडाली भूरकन्
बाळ पडला धपकन
आईनी उचलला पटकन्
पापा घेतला
मटकन्

# संग्रामदेवता ( झांशीची राणी )

खड्ग ढाल जिच्या हातीं । स्वातंत्र्याची दिव्य स्फूर्ति
भूषवी देशाला । कोणही बाला ॥ धृ ॥

दांडपट्टा भालाफेक । तलवारीची पेलून झेंप
घोड्यालाही मारी टांच । दाविते शौर्याला
बोला—कोणही बाला ॥ १ ॥

हत्ती मागे खेळायासी । नाहीं म्हणता नाना तिसी
ठसक्यांत सांगे त्यासी । मिळवीन हत्तीला
कोणही बाला ॥ २ ॥

पाठीलागी बांधूनी पुत्र । घोड्याची ही अवलख फेक
दौडत नेला रात्री खूप । फोडूनी फळीला
कोणही बाला ॥ ३ ॥

तोंडी बोट शत्रु घाली । दिव्य ज्योत मावळली
स्वातंत्र्याची खूण बाणली । चेतवी संग्रामाला
कोणही बाला ॥ ४ ॥

# चेंडूफळी ( चाल—सुटी झाली )

चल जाऊं कान्हा । गाई चराया नेऊं रानांत
गाई चरती शेतांत । वांसरें खेळती शेतांत
घुमे मुरलीचा सूर हा कानांत ॥ १ ॥

खेळूं चेंडू फळी । खो खो आट्यापाट्या
नाहीं कुणीच आतां भांडायचं
मन मुराद इथें खेळायचं ॥ २ ॥

चेंडू उंच उडला । पाण्यामध्यें पडला
चेंडू बुडे डोहांत । पडे डोहांत यमुनेच्या ॥ ३ ॥

कान्हा उडी मारी । नाग फणा काढी
फुत्कार जोरांत करी । विळखा घालीत कन्हैयाला ॥४॥
कान्हा आवळी फणा । नाचवी कालियाला
लीन चरणी झाला । आणी नाचत वरी कृष्णाला ॥५॥

कान्हा वरती आला । कालिया गुप्त झाला
झाला आनंद गोकुळाला ॥ ६ ॥

# मुलें नी फुलें

मेधा शोभा सरला । सुधीर अरुण
चला रे फिरायला
कीं बागेत चला रे फिरायला
हजारी मोगरा शेवंती पिवळी । गुलाब फुललेला
कीं ह्या हो गुलाब फुललेला
जाई जुई चांफा बकुळ मालती । डेलीया शोभेला
कीं निळा डेलीया शोभेला
जास्वंदी लाल केशरी झेंडू । सोनटांका फुललेला
कीं पांढरा सोनटांका फुललेला
हातांत परडी घेऊनी जाऊंया । फुलं तीं वेंचायला
कीं जाऊंया फुलं तीं वेंचायला
सुगंधी फुलं गोजीरी मुलं । आनंद लुटण्याला
कीं जाऊंया आनंद लुटण्याला

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय शाखा.
क्र. १९२९
वि.

## मावळ मराठा

कालच आलों घोटावरूनीं आणला वटाटा नवा ।
गड्यांनो आणला वटाटा नवा ।
लिंबूर हुरडा वला हरभरा भाजून तो खावा ।
गड्यांनो भाजून तो खावा ॥
मोत्यावाणी शुभ्र जोंधळा शेत डौलदार ।
गड्यांनो शेत डौलदार ।
लसणाच्या त्या चटणीसंग खावी शिळी भाकर ।
गड्यांनो खावी शिळी भाकर ॥
ताजी ताजी उन उन ती खावी तुम्हीं भाकर ।
गड्यांनो खावी तुम्हीं भाकर ।
अंबाडीच्या भाजीवरती तेलाची धार ।
गड्यांनो तेलाची धार ॥
गहूं खांडवा खावा तुम्हीं पुरणपोळी सांजा ।
गड्यांनो पुरणपोळी सांजा ।
उसळीसाठीं आणला वाटाणा पुण्याचा हो ताजा ।
गड्यांनो पुण्याचा हो ताजा ॥
खाऊनशानी बना शूरवीर जणूं तानाजी शिवबा ।
गड्यांनो तानाजी शिवबा ।
महाराष्ट्रांचे बच्चे तुम्हीं करा देशसेवा ।
गड्यांनो करा [illegible] ॥

IRBK-0108129
IRBK-0108129